# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
## १७ आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info
E_mail ID- admin@jdhepune.info
फोन नं.०२०-२६१२७८३३
फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/अ.ज.जात वैधता/२०२०/1490 दि.०३/०२/२०२०

**महत्वाचे/ई-मेलद्वारे**

प्रति,

१) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
३) कुलसचिव, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
४) कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
५) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

विषय:- माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत...

संदर्भ:- १) या कार्यालयाकडील समपत्र क्र.२७७, दि.२४/०१/२०२०.
२) मा.संचालनालयाकडील क्र.उशिसं/मवि-१/अधिसंख्य पदे/२०२०/१३४१, दि.०१/०२/२०२०.

उपरोक्त विषयाबाबतची संदर्भिय पत्रे अवलोकनी घ्यावीत.

संदर्भिय पत्रान्वये सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२१/१२/२०१९ अन्वये माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

उक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार आपल्या अकृषि / अभिमत विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांनी शासन निर्णयानुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन, शासन निर्णयातील निर्देशानुसार अनुपालन अहवाल दि.२७/०१/२०२० पर्यंत सादर करणेबाबत अवगत करण्यात आले होते. तथापि, अद्याप सदरचा अहवाल अप्राप्त आहे.

प्रस्तूत प्रकरणी शासन निर्णय दि.२१/१२/२०१९ या शासन निर्णयातील सूचनांप्रमाणे तसेच शासन निर्णय दि.१०/०९/२००१ अन्वये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार आपल्या विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या आस्थापनेवर जी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत. अशा पदांना वित्त विभागाची मान्यता घेणे अनिवार्य आहे.

वित्त विभागास शासन निर्णयातील परिशिष्ठ-इ मधील तरतूदीनुसार आपल्या विद्यापीठाच्या आस्थापनेवरील शिक्षक/शिक्षकेतर पदांचा प्रस्ताव तयार करुन **तात्काळ** सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक/शिक्षकेतर पदांचा एकत्रित प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडून या कार्यालयाकडे **तात्काळ** सादर करण्यात यावा.

**(डॉ.मोहन खताळ)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

प्रत:-

१) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक.

२/- यांना कळविण्यात येते की, उक्त प्रमाणे शासन निर्णयातील तरतूदीनुसार आपल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर पदांचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील क्र.आरक्षण/ओ-२२/११५१, दि.२४/१२/२०१९ अन्वये निर्गत केलेल्या परिपत्रकानुसार विहीत प्रपत्रात विद्यापीठाकडे **तात्काळ** सादर करण्यात यावा.